# आर्थिक विषमतेमध्ये शासकीय धोरणाच्या भूमिकेबद्दल डॉ. अमर्त्य सेन यांचे विश्लेषण

**प्रा. चंद्रशेखर फरकाडे**
सहायक प्राध्यापक
हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर
इ मेल chandufarkade@rediffmail.com

**सारांश**

भारतीय समाज हा वर्ग, जाती आणि विविध समुदायामध्ये विभागलेला समुदाय असून भारतीय भुखंडामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता पाहायला मिळते. आर्थिक विषमते सोबतच सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. देशातील लोकसंख्येच्या कार्यकुशलतेमध्ये मोठ्या प्रमाणात घट होते. लोकांची कार्यक्षमता कमी होऊन देश व आर्थिक घडामोडीमध्ये मागे पडत जातो. देशातील आर्थिक घडी विस्कळीत होऊ नये किंवा आर्थिक सरंचनेला खीळ बसू नये यासाठी शासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातात. शासनाद्वारे बरीच आर्थिक धोरणे राबविली जातात. शासनाद्वारे राबवलेली धोरणे आर्थिक विषमतेमध्ये काय योगदान देतात किंवा प्रसंगी शासकीय धोरणाच्या अक्षम्यतेमुळे देशातील विषमता नष्ट होण्याऐवजी ती समाजामध्ये कशा प्रकारे आजही समाजामध्ये विद्यमान आहे. आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करण्यात शासनाची धोरणे का प्रभावी ठरली नाही. एकंदरीत या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. अमर्त्य सेन यांनी प्रकाश टाकला असून आर्थिक धोरण आणि आर्थिक विषमता यांच्यातील संबंधाचे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये याच विश्लेषणाचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रस्तावना**

संपूर्ण जगभरामध्ये वेगवेगळ्या स्वरूपाची विषमता विद्यमान आहे. परंतु त्या विषमतेचे स्वरूप भिन्न आहे. भारतामध्ये विघातक स्वरूपातील विभाजन आणि विषमतेची मोठ्या प्रमाणात घालमेल आहे. अशा प्रकारचे विभाजन आणि विषमतेची परिस्थिती जगामध्ये इतरत्र कुठेही नाही. कारण भारत हा असा देश आहे की, ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमतेसोबत जात, वर्ग, लिंग इत्यादी आणखी कितीतरी प्रकारच्या विषमता विद्यमान आहे. भारतामध्ये जी जातीवर आधारित विभागणी आहे ती जगामध्ये इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही. जातीवर आधारित विषमता ही वर्गावर आधारित विषमतेला मोठ्या प्रमाणावर खतपाणी घालण्याचे काम करते.

भारतामध्ये स्त्री –पुरूष विषमता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. भारतातील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात महिलांच्या सामाजिक दर्जावर आघात होतांना दिसून येतो. अशाच प्रकारच्या विविध विषमतेमुळे भारतातील सामाजिक व्यवस्था ही दमनकारी म्हणून संबोधली जाते आणि या दमनकारी व्यवस्थेमध्ये अभावग्रस्तता आणि अधिकारहीनता जन्म घेत आणि जनतेला अशाच प्रकारच्या स्थितीत जीवन जगावे लागते. अशा प्रकारची विरासत भारतासारख्या महान भूमीला लाभलेली आहे. अशा प्रकारच्या विचित्र स्थितीमुळे जी आर्थिक विकासाची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवण्याचे जे स्वप्न पाहिले जाते. ते मात्र पूर्ण होऊ शकत नाही. विषमतेमुळे समाज हा भिन्न–भिन्न स्वरूपात विभागला जातो. राष्ट्रीय उत्पन्न वितरणामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता पाहायला मिळते. तसेच प्रदेशा– प्रदेशांमध्ये आर्थिक समृद्धीच्या आधारावरही विषमता दिसून येते. काही समृद्ध तर काही कमी विकसित आणि सामाजिक व्यवस्थेत बऱ्याच अशा असामाजिक गोष्टीचा उदय होतो सामाजिक नैराश्य ही जन्माला येते. देशातील जनजीवन सुकर होण्याऐवजी बिकट होण्याला सुरूवात होते आणि

त्यामुळे समाजातील या विषमता नष्ट होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते भारतामध्ये कल्याणकारी व्यवस्था असून देशामध्ये लोकशाही शासन व्यवस्था आहे. अशा प्रकारच्या जबाबदार लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. स्वातंत्र्यप्राप्ती पासून तर आजपर्यंत शासनाद्वारे जी काही धोरणे राबवण्यात आली असून या आर्थिक सामाजिक धोरणाच्या माध्यमातून देशामध्ये आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढतच गेली. विषमता नष्ट होण्यासाठी ज्या धोरणाची आवश्यकता होती. त्या प्रकारची धोरणे राबविण्यात आली नसल्याने किंवा प्रसंगी शासनाची यामध्ये फारसी रूची नसल्याने शासकीय धोरण उदासीन असल्याचेच दिसत आले आहे. एकंदरीत या शोध निबंधामध्ये आर्थिक विषमतेत शासकीय धोरणाच्या भूमिकेबद्दल डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार प्रस्तुत करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

भारतातील आर्थिक सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे.

विषमतेसंदर्भात शासकीय धोरणाची भूमिका जाणून घेणे.

विषमते संदर्भात शासकीय धोरणाविषयी डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितके**

भारतातील विषमता नष्ट करण्यात शासकीय धोरणे कमी पडत आहे.

भारतातील विषमता कमी करण्यास शासन उदासीन दिसून येते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम माहिती पद्धतीचा वापर करण्यात आला असून त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**डॉ. अमर्त्य सेन यांचे विषमतेविषयक विचार**

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते मानव आणि मानव समुहात व्याप्त असलेली विषमता ही सहज ओळखता येण्यासारखी वाटत असली तरी त्यात खूप मोठ्या प्रमाणात अडचणी असल्याने विषमता ही संकल्पना साधी तसेच क्लिष्ट अशा दोन्ही स्वरूपात विद्यमान आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते विषमता ही वेगवेगळ्या स्वरूपात असून या संकल्पनेमुळे समाजात न्यायाची संकल्पना अस्तित्वात येऊ शकत नाही आणि म्हणून समाजातील व्याप्त विषमतेचे प्रमाण ओळखून या विषमतेचा समाजावर काय परिणाम होईल आणि विषमतेच्या दुष्परिणामांचा प्रभाव कसा कमी करता येईल याचे विश्लेषण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. अमर्त्य सेन यांनी सामुहिक आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित अर्थशास्त्रातील अनेक विचारधारेचे खंडण करून आर्थिक विषमतेला व्यावहारिक जोड प्रदान केली आहे की, ज्याच्या आधारावर मनुष्य जीवनातील गरिबीच्या समस्येबाबत आपल्याला चांगले काम करता येऊ शकते. डॉ. अमर्त्य सेन यांनी विषमतेच्या मापनाला खूप दूर पर्यन्त विकसित केले. डॉ. सेन यांचे विचार आणि त्यांचा विचारावर आधारित योजना या विकसनशील देशासाठी उपयुक्त ठरतात.

**भारतातील विषमतेचे स्वरूप**

भारतातील विषमतेचे स्वरूप हे भिन्न –भिन्न स्वरूपामध्ये दिसून येते. आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, राजनैतिक विषमता तसेच इतर अनेक प्रकारच्या नैसर्गिक विषमतासुद्धा भारतीय प्रदेशांमध्ये पाहायला मिळतात. या विषमतेमुळे देशातील आर्थिक संरचनेमध्येसुद्धा विषमता निर्माण होते. भारतातील विषमता ही पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

### अ) उत्पन्नातील विषमता आणि आर्थिक विभाजन

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पन्नातील विषमता आढळून येते. २००४—०५ च्या ‘‘मानव विकास सर्व्हेक्षण’’ च्या अहवालानुसार गिनी गुणांक ०.५४ होता. गिनी गुणांकाचे मापन ० ते १ च्या दरम्यान केले जाते. गिनी गुणांकाचे उत्तर ० पेक्षा जितके अधिक तितकी विषमता मोठ्या प्रमाणात राहते. मानव विकास अहवालावरून लक्षात येते की, भारतामध्ये उत्पन्नातील विषमता मोठ्या प्रमाणात आहे. तसेच जागतिक अधिकोषाच्या अहवालानुसार सांगितले जाते की, भारतामध्ये उत्पन्न वितरणातील विषमता ही ब्राझील, दक्षिण, आफ्रिका सारखी उच्च विषमता विद्यमान आहे.

तसेच भारतामध्ये वर्तमान काळामध्ये शहरी आणि ग्रामीण भागामध्ये आर्थिक विभाजनामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता पाहायला मिळते. वर्तमान परिस्थितीत भारतामध्ये जो तीव्र आर्थिक विकास झालेला आहे. त्याचा फायदा हा देशातील समृद्ध लोकांना जास्त झाल्याचे दिसून येते. उत्पन्न हे उच्च वर्गातील लोकांकडेच आकर्षित होतांना दिसते.

### ब) जाती आधारित विषमतेचे स्वरूप

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात जाती आधारित विषमता पाहायला मिळते. भारतामध्ये भूतकाळामध्ये जाती—जातीमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. जातीव्यवस्थेतील सर्वात खालच्या स्तरावरील जातीतील लोकांना खूप कष्टाने जीवन जगावे लागत होते. वर्तमान काळामध्ये अशा प्रकारच्या भेदभावामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली असली तरी या जातीव्यवस्थेतील व्यावसायिक वितरणातील विषमता आजही कायम आहे. आजही प्रतिष्ठित नोकरी किंवा उच्च सरकारी पदे प्राप्त करण्यात उच्च जातीचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. हीच संकल्पना पुढील तक्त्यावरून अगदी सहज लक्षात येईल.

**देशातील उच्च पदस्थ नोकरीविषयक स्थितीदर्शक सारणी**

| अ.क्र. | संदर्भ | रिक्त पदे | उच्च संवर्गातून भरलेली पदे (टक्केवारी मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | अलाहाबाद प्रेस | **16** | **100** |
| २ | शिक्षक संघटनेचा नेता | **17** | **100** |
| ३ | जाहिरात एजन्सी मालक | **11** | **91** |
| ४ | वरिष्ठ डॉक्टर | **99** | **89** |
| ५ | बार असोशिएशन | **25** | **86** |
| ६ | वकील संघ | **14** | **79** |
| ७ | समाज अध्ययन प्राध्यापक | **15** | **80** |
| ८ | मजूर नेता | **41** | **76** |
| ९ | अलाहाबाद विद्यापीठ व्याख्याता पदे | **112** | **76** |
| १० | पोलीस अधिकारी | **68** | **100** |
| ११ | आय.आय.टी. फॅकल्टी | **47** | **68** |
| १२ | हायकोर्ट जज | **75** | **68** |
| १३ | हायकोर्ट वकील | **100** | **67** |
| १४ | व्यापारी संघ | **06** | **67** |
| १५ | प्राचार्य | **16** | **56** |

**स्त्रोत : ज्याँ ड्रीज, आशीष गुप्ता २०१२**

वरील तक्त्यामध्ये भारतातील अलाहाबाद शहरातील उच्च संवर्गातील व्यक्तीनी धारण केलेल्या पदाचा आढावा घेतला आहे. अलाहाबाद हे केवळ एक उदाहरण आहे. परंतु अशाच प्रकारचे चित्र संपूर्ण भारतभर दिसून येते. संपूर्ण भारतामध्ये ज्या काही उच्च पदस्थ नोकऱ्या आहे. त्या जास्तीत–जास्त उच्च संवर्गातील लोकांच्या ताब्यात आहे.

**क) लिंगविषयक विषमता :**

भारतामध्ये स्त्री –पुरूष विषमता पाहायला मिळते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीला सामाजिक तसेच सांस्कृतिक संबंधाला नवे आयाम प्रदान करतात. संपत्तीचा वारसा हक्क हा पूर्णपणे पितृसत्ताक आहे. तसेच विवाहानंतर निवाससुद्धा पितृस्थानीय आहे. महिलांच्या विविध कृती या बऱ्याच प्रमाणात प्रतिबंधित असल्याचे दिसते. घरगुती हिंसाचार, हुंडा पद्धती यासारख्या सामाजिक प्रथासुद्धा स्त्री –पुरूष समानतेला खतपाणी घालतात. तसेच भारतामध्ये स्त्री –पुरूष विषमतेची भरपूर अशी कारणे आहे. भारतामध्ये महिला कामगारांची भागीदारी ही आंतरर्राष्ट्रीय मापदंडानुसार खूप कमी आहे. तसेच राजनीतिक व्यवस्थेमध्येसुद्धा महिलांचा सहभाग कमी आहे. या सर्व बाबींमुळे स्त्री –पुरूष असमानतेत वाढ होत आहे.

**ड) ग्रामीण आणि शहरी जीवनातील विषमता**

ग्रामीण आणि शहरी भागातील जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते. ग्रामीण भागातील उत्पन्न आणि उपभोग खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. अत्यंत कमी अशा उपभोग खर्चावर ग्रामीण भागातील लोक जीवन जगत असतात. ज्याप्रमाणे शहरातील सोयी–सवलती प्राप्त होतात, पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नाही. रोजगाराच्या संधी जवळपास नसताताच आणि शेवटी पर्याय म्हणून केवळ लोक कृषी श्रमिक किंवा कृषीशी संबधित इतर व्यवसायामध्ये गुंतले राहतात. दिवसेंदिवस ही विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. औद्योगिकरण आणि खाजगीकरणाने थोड्या फार प्रमाणात चित्र बदलल्याचे भासत असले तरी ज्या आर्थिक विकासाची आवश्यकता ग्रामीण भागामध्ये आहे, तसा तो होताना दिसून येत नाही. शहरांमध्ये विकासाची जी काही उधळण दिसून येत आहे. त्याच्याशी ग्रामीण भागाचा संबंध येत नाही आणि त्यामुळे या विषमता आणखी जास्त वाढत आहे. तर आर्थिक आणि सामाजिक सुधारणा कार्यक्रमालाच ग्रहण लागण्याची शक्यता बळावत जाते आणि दलित, गरीब समुदायामध्ये मानवाधिकाराचे उल्लघंन होणाऱ्या घटनांचे प्रमाण वाढत जाते.

**विषमतेमध्ये शासकीय धोरणाची भूमिका**

भारतीय अर्थव्यवस्था किंवा समाजातील आधारभूत गोष्टींमधील उणीवा शोधून त्या दूर करण्याची अपेक्षा मागील सर्व सरकारकडून करण्याची अपेक्षा होती. परंतु तसे झाले नाही. एकूण राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली असली तरी आधारभूत गोष्टीची उपेक्षाच होत आली. त्यामध्ये प्रशासनिक मूलभूत बदल पाहायला मिळायला नाही. सार्वजनिक तसेच मूलभूत शिक्षण प्राथमिक आरोग्य सेवा, यासारख्या सार्वजनिक सेवांची उपेक्षा शासनाकडून मोठ्या प्रमाणात होत आली आहे.

भारतीय समाज हा वर्ग, जाती, समुदायामध्ये विभागला आहे. भारतीय समाजातील ही दरी कमी करण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे होते. मात्र भारतामध्ये शासन त्याप्रकारे जातीवर आधारित राजकारणाला प्राधान्य देतात. त्यामुळे अशा प्रकारच्या विभाजनाला आणखी बळ प्राप्त होते. त्यामुळे विषमता नष्ट होण्याऐवजी वाढत जातात. याचा परिणाम असा होतो की, समाजातील मूलभूत उणीवा कमी होण्याऐवजी वाढत जातात.

भारतातील गरिबीची तुलना केल्यास असे लक्षात येते की, चिन सारख्या देशांमध्येसुद्धा गरीबी अस्तित्वात आहे. परंतु तेथील गरिबांना शिक्षण, आरोग्य सेवा, पर्याप्त भोजन, पर्याप्त पोषण या सारख्या मूलभूत सेवा उपलब्ध करून देण्यास शासन असमर्थ ठरते. त्यामुळे चिनसारख्या देशांमध्ये जी सहकारीतेची

किंवा सहभागपूर्ण विकासाची संकल्पना पाहायला मिळते ती मात्र भारतामध्ये पाहायला मिळत नाही. सहकारीतेचा अभाव कायम दिसून येतो.

भारतातील सामाजिक विषमता कमी करण्यासाठी देशातील वंचित तसेच दलित लोकांना अधिकार प्राप्त होऊ शकेल अशी परिस्थिती देशामध्ये निर्माण करणे ही शासनाची मुख्य भूमिका असते. देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी देशामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक असते. देशात रोजगार निर्माण झाल्यास लोकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊन आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होऊ शकते. रोजगार निर्माण करण्यात वेळोवेळी सरकार अक्षम्य ठरले असून त्यात भरीस भर अलीकडच्या काळामध्ये नोटबंदी आणि जीएसटी सारखे निर्णय होऊन देशातील छोट्या आणि मध्यम उद्योगाचे कंबरडे मोडले असून पुन्हा बेरोजगारीचा प्रश्न ऐरणीवर येऊन विषमता वाढण्यास मदत झाली.

सामाजिक नितीगत धोरणामध्ये भेदभाव पाहायला मिळतो. भारत नैतिक तसेच बौद्धिक दिवाळखोरीच्या वाटेवर हा समाज आपली वाटचाल करतो की काय? असा प्रश्न पडतो. आधुनिक काळात बौद्धिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पतन होतांना दिसून येत असल्यामुळे आर्थिक तथा सामाजिक घडामोडीमध्ये गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. कारण सरकारद्वार जनतेच्या वैयक्तिक विचारांना प्रतिबंध घालणे, पुस्तकांवर प्रतिबंध, आपल्या विरोधी संघटनावरील दमनकारी चक्र, सोशल मिडीयावरील प्रतिक्रिया नियंत्रित करण्याची भूमिका इत्यादी बाबतीत शासनाचे धोरण जबाबदार ठरते.

शासनाद्वारे जी काही आर्थिक धोरणे राबवली जातात. त्यामध्ये केवळ उच्चभ्रू घटकांना जास्त प्राधान्य देण्यात आल्याचे दिसते. कुठल्याही कायद्यामध्ये पळवाटा त्यांना मिळवून दिल्या जातात. शासन यंत्रणेतील भ्रष्टाचार हा मुद्दा आणखी महत्त्वाचा ठरतो. या भ्रष्टाचारांमध्ये जास्तीत–जास्त श्रीमंत वर्गातील लोकांचा समूह असतो. भ्रष्टाचारी कर्मचारी आणि कोणतेही धोरण लागू करण्यात शासनातर्फे दिरंगाई या गोष्टीमुळे त्या धोरणाची उद्दिष्टे प्राप्त होत नाही. मात्र त्या योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो.

आधुनिक काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेला मिश्र अर्थव्यवस्थेतून भांडवलवादाकडे घेऊन जाण्यास सरकार शर्थीचे प्रयत्न करतांना दिसून येते. परंतु त्या भांडवलवादामध्ये देशातील मध्यम, गरीब, दलित वर्गाची काय भूमिका राहील किंवा या धोरणाचा या वर्गावर काय परिणाम होईल याचा विचारद्धा होतांना दिसत नाही. एकीकडे देशामध्ये उदारीकरण, जागतिकीकरणाचे वारे जोरात वाहत असतांना या सर्व ठिकाणी आपल्या देशातील मध्यम वर्ग तग धरू शकतो काय याचा विचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु शासनातर्फे मोठ्या प्रमाणात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाला मान्यता देत असतांना मध्यम वर्गाकडे हेतु पुरस्पर दुर्लक्ष केल्याचे जाणवते आणि म्हणूनच जितक्या वेगाने देश हा भांडवलवादाकडे सरसावत आहे. तितक्याच वेगाने आर्थिक सामजिक विषमता सुद्धा वाढत आहे.

**निष्कर्ष :**

डॉ. अमर्त्य सेन यांच्या विचारानुसार भारतामध्ये आर्थिक आणि सामाजिक विषमता वाढल्यास शासकीय धोरणाची भूमिका जबाबदार आहे. या विषमता समाजातून नष्ट करण्यासाठी कोणतेही धोरण राबवत असतांना तसेच लोकशाही राजनैतिक व्यवस्थेमध्ये वंचित लोकांचे जीवन, त्यांचे अधिकार आणि त्यांच्या गरजांवर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. भारतामध्ये सामाजिक विषमतेमुळे लोकशाही व्यवस्थेला कमकुवत केले आहे. म्हणूनच केवळ सत्ता प्राप्त करणे हा राजकीय पक्षाचा हेतू असतो आणि यातूनच कार्पोरेट शक्ती, विशेषाधिकार प्राप्त लोकांचा समूह एकत्रित होऊन तेच समाजाला दिशा–निर्देश देण्याचे कार्य करतात आणि त्यामुळे सामाजिक हितापेक्षा स्वहिताला प्राधान्य दिले जाते आणि सामाजिक मूल्यांचा विसर पाडला जातो. तसेच हाच वर्ग अप्रत्यक्षपणे सरकारलाही सत्ता प्राप्त करण्यामध्ये मदत करू लागतो. त्यामुळे जेव्हा प्रत्यक्ष धोरणाची

अंमलबजावणी होऊ लागते. तेव्हा शासनाद्वारे यांच्याच हितसंबंधाला प्राधान्य देणारी धोरणे अंमलात आणली जातात आणि म्हणून लोकशाही व्यवस्थेच्या मार्गातून देशाचा आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर सर्व घटकांची जबाबदारी सुनिश्चित करून देशांमध्ये ज्या मूलभूत समस्या आहे. त्या सोडवण्यास प्राधान्य दिले पाहिजे, तरच समाजातील विषमता कमी होऊन एक श्रेष्ठ भारत बनण्यास मदत होईल.

## संदर्भ ग्रंथ सुची


**1)** Sen A.K., (1982) “Choice of Welfare, and Measurement”, OxforUniversit Press.

2) Ambedkar B.R., (1936) “Anhilation of Cast”, reprinted 1990 with anIntroduction by Mulk Raj Anand, New Delhi, Arnold.

3) Sen Amartya (1979) “Equality of What”, Access from www.the philosophy.com.con.amprocet.com

4 ज्याँ ड्रींज और सेन अमर्त्य (२०१८) ‘‘भारत और उसके विरोधाभास’’, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली

5 सेन अमर्त्य, (२००६) ‘‘हिंसा और अस्मिता का संकट’’, राज्यपाल एण्ड सन्स कश्मिरी गेट, दिल्ली.

6 देशपांडे विनायक, (२००३) ‘‘नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ’’, लाखे प्रकाशन, नागपूर

7 तिवारी अजय कुमार, (२०१३) ‘‘केवढा प्रासंगीक होईल रा ट्रीय खाद्य सुरक्षा कायदा’’, प्रतियोगिता दर्पन.